दिनांक :       .०३.२०१९

प्रति,

मा. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री,

नवी देहली.

**विषय : लहान मुले आणि युवक यांना भ्रमणभाषमध्ये सहज उपलब्ध होणाऱ्या विविध पॉर्न साईट आणि अश्लीलता अन् हिंसक दृश्ये यांचा भडिमार असलेल्या 'वेब सिरीज' यांवर त्वरित बंदी घालणे, तसेच सार्वजनिक ठिकाणांवर विनामूल्य 'इंटरनेट' उपलब्ध केल्यामुळे होणारे दुष्परिणाम रोखणे, यांविषयी....**

महोदय,

लहान मुले हे राष्ट्राचे भविष्य, तर युवापिढी ही राष्ट्राचा आधारस्तंभ असतात. दुर्दैवाने आज आदर्श सत्पुरुष आणि संत यांची परंपरा लाभलेल्या आपल्या देशातील बहुसंख्य लहान मुलांपासून ते युवावर्ग भ्रमणभाषवरील अश्लील अन् अनैतिक संकेतस्थळे बघण्याकडे आकर्षिला जात आहे. परिणामी लहान मुले आणि युवावर्ग यांचा बहुमूल्य वेळ वाया जात आहे आणि पर्यायाने देशाचे भवितव्य रसातळाला जात आहे, अशी स्थिती दिसत आहे. पालकवर्ग मानसिक दडपणाखाली असून चिंताग्रस्त बनत चालला आहे. देशासमोरील ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. गेल्या काही वर्षांत लहान मुलांचे लैगिंक शोषण, अल्पवयीन मुलांकडून होणारे या संदर्भातील अपराध यांमध्ये दिवसेंदिवस होत चाललेली वाढ, हा गंभीर परिणाम युवा पिढीवर दिसून येत आहेत.

**अ. पॉर्नसाइट आणि अश्लील संकेतस्थळे :** गेल्या काही वर्षांतील गंभीर स्थिती पहाता भारतात 'चाइल्ड पोर्नोग्राफी'वर बंदी घालण्यात आली आहे. असे असले तरी अन्य पोर्नसाइट पहाणे, हे सर्वांसाठी सहजशक्य आहे. त्यामुळे केवळ 'चाइल्ड पोर्नोग्राफी'वर बंदी घालून समस्या सुटणार नाही, तर सरसकट सर्वच पोर्नसाइटवर बंदी घालणे अपरिहार्य बनले आहे.

अ १. देशातील वाढत्या बलात्कारांच्या घटनांमागे अश्लील संकेतस्थळांचा प्रभाव असल्याची माहिती या संदर्भात करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणातून मिळाली आहे. अशी २५ संकेतस्थळे बंद करण्यात आली आहेत. अशा सर्वच संकेतस्थळांना बंद करण्याची मागणी केली आहे, अशी माहिती मध्यप्रदेशचे माजी गृहमंत्री भूपेंद्र सिंह यादव यांनी एका पत्रकार परिषदेत दिली. लहान मुलांवर अशा संकेतस्थळांचा परिणाम होतो, असेही ते म्हणाले.

अ २. कर्नाटक येथे 'रेस्क्यू' या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या एका सर्व्हेक्षणामध्ये धक्कादायक माहिती समोर आली आहे. या सर्व्हेक्षणात कर्नाटकातील १८३ महाविद्यालयांतील १६ ते २१ वयोगटातील तब्बल ३५०० महाविद्यालयीन मुला-मुलींनी सहभाग घेतला. याचे निष्कर्ष अतिशय गंभीर आहेत.

अ २ अ. ६६ टक्के मुले प्रती सप्ताह ७ घंटे, तर ३० टक्के युवती प्रती सप्ताह ४ घंटे पॉर्न साइट पहातात. धक्कादायक म्हणजे यांपैकी काही जण ९ वर्षांचे असल्यापासून पॉन साइट पहात असल्याचे सांगितले.

अ २ आ. यात ३० टक्के मुलांनी 'व्हायलंट पॉर्न' पहातात; त्यात सरासरी आठवड्याला १९ बलात्कार पहात असल्याचे सांगितले. प्रत्येक वर्षी तब्बल १.७ लाख विद्यार्थी नव्याने बलात्कार पहाण्यास आरंभ करतात आणि उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेईपर्यंत त्यांनी ४९०० बलात्कार पाहिलेले असतात.

अ २ इ. ८४ टक्के मुलांना पॉर्न पहाणे, हे पुढारलेपणा आणि व्यसन असल्याचे वाटते.

अ २ ई. ८३ टक्के मुलांनी पॉर्न पाहून लैगिंक कृती करण्यास उद्युक्त होत असल्याचे, तर ७४ टक्के मुलांना वेश्यांकडे जाण्यास उद्युक्त होत असल्याचे सांगितले. ७६ टक्के मुलांनी सांगितले की, बलात्कार पाहून प्रत्यक्ष कोणावर तरी बलात्कार करावा, अशी भावना निर्माण होते. त्यातील केवळ १० टक्के मुले त्यावर कृतीप्रवण होतात. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, कर्नाटकामध्ये प्रतीवर्षी नवीन १३००० बलात्कारी पुरुष तयार होत आहेत.

अ २. 'पोर्नहब' या संकेतस्थळाने अश्लील संकेतस्थळे (पॉर्न साईट) पहाण्याच्या प्रमाणाचा जागतिक अहवाल घोषित केला आहे. या अहवालानुसार वर्ष २०१४ मध्ये स्मार्टफोनवर अश्लील संकेतस्थळे (पॉर्न साईट) पहाण्यात देशात महाराष्ट्र ५ व्या स्थानावर होता; मात्र मागील ३ वर्षांत पॉर्न साईट पहाण्याच्या प्रमाणात ७५ प्रतिशत इतकी वाढ झाली असून महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

अ ३. जागतिक पातळीवर नियमित सरासरी ८.५६ मिनिटे अश्लील संकेतस्थळे पहाण्याचे प्रमाण आहे. भारतात नियमित ८.२२ मिनिटे इतका वेळ अश्लील संकेतस्थळे बघितली जातात. महाराष्ट्रात हे प्रमाण ८.३७ मिनिटे इतके आहे. इंटरनेट स्वस्त झाले, तसे त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत.

अ ४. केंद्र सरकारने लहान मुलांच्या संदर्भातील अश्लील चित्रपट आणि चित्रफीती, तसेच अन्य आक्षेपार्ह साहित्य असणारी ५ हजार संकेतस्थळे जानेवारी २०१८ मध्ये बंद केली. यासाठी केंद्र सरकारने विशेष धोरण बनवले होते. असे धोरण बनवतांना अशा संकेतस्थळांचा प्रसार करणाऱ्यांना कठोर शिक्षेचीही तरतूद करण्यासाठी माहिती-तंत्रज्ञान कायद्यात काही सुधारणा केल्या आहेत. अशा प्रकारची सुधारणा वेश्या व्यवसाय चालणाऱ्या संकेतस्थळांवर बंदी आणण्यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत.

**आ. वेश्याव्यवसाय चालवणारी संकेतस्थळे :**

आ १. गोव्याचे तत्कालीन पोलीस महानिरीक्षक जसपाल सिंह गेल्या महिन्यात म्हणाले,'कोणत्याही पर्यटनस्थळी अमली पदार्थ, वेश्या व्यवसाय आणि जुगार यांसारखे गुन्हे घडतच असतात; पण गोवा पोलीस या संदर्भात तुलनेने उत्तम कामगिरी बजावत आहेत. गोवा पोलीस वेळोवेळी अशा अनैतिक धंद्यांचे पितळ उघडे पाडतात; मात्र संकेतस्थळांवरून चालवला जाणारा वेश्या व्यवसाय उखडून टाकणे कठीण जात आहे. ही संकेतस्थळे बंद करावीत, अशी मागणी केंद्रीय माहिती-तंत्रज्ञान खात्याला पत्राद्वारे केली होती; मात्र याविषयी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे नसल्याचे सांगून त्यांची ही मागणी फेटाळली. केवळ देशाच्या सुरक्षेला घातक ठरणारी संकेतस्थळे बंद करण्यास मान्यता आहे. अन्य संकेतस्थळांना हा नियम लागू होत नाही, असे उत्तर माहिती तंत्रज्ञान खात्याने दिले आहे. त्यामुळे या संकेतस्थळांद्वारे चालवल्या जाणाऱ्या वेश्याव्यवसायाला लगाम घालणे कायद्याने शक्य होत नाही.' याचा अर्थ असा होतो की, केवळ तशाप्रकारचा कोणताही कायदा नसल्याने अशा अनैतिक आणि अवैध गोष्टींवर प्रतिबंध आणता येत नाहीत.

आ २. तंत्रज्ञान विकसित झाल्याने मोबाईलद्वारे वेश्याव्यवसाय करणारी संकेतस्थळे सहज उपलब्ध झाली आहेत. अशा अनैतिक गोष्टी सहजपणे उपलब्ध होत असल्याने गुन्हेगारी क्षेत्राशी संबंधित लोकांना यात शिरकाव करण्याचा मार्ग मोकळा होत आहे. हे लोण आता गोवा, मुंबई, देहली यांसारख्या ठराविक शहरांपुरते मर्यादित राहिले नसून देशातील अन्य शहरांमध्येही त्याचे दुष्परिणाम दिसत आहेत. ऑनलाइन वेश्याव्यवसायासोबत मानवी तस्करी (ह्युमन ट्रॅफिकिंग), अंमली पदार्थांची विक्री आदी गुन्हेही साखळी स्वरूपात चालू होतात. त्यामुळे या गोष्टींकडे दुर्लक्ष करणे हे समाजहिताच्या दृष्टीने अक्षम्य असेल.

आ ३. भारतात पोर्नोग्राफीवर बंदी आहे, त्याच प्रकारे अशाप्रकारे चालवल्या जाणाऱ्या ऑनलाइन वेश्या व्यवसायाशी संबंधित संकेतस्थळेही बंद करता येऊ शकतात. यासाठी राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे.

आ ४. या संकेतस्थळांमुळे विविध गुन्हे वाढत असून ते रोखण्यासाठी ती बंद करायला हवीत. अशी 'अश्लील संकेतस्थळे' अर्थात 'पॉर्नसाइटस्' पहाणे, याद्वारे लैंगिक भावना उद्दिपित होऊन बलात्काराच्या घटना घडल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**इ. वेब सिरीज :**

इ १. सध्या विदेशांतील 'नेटफ्लिक्स', 'ॲमेझॉन' या विदेशी, तसेच अनेक भारतीय आस्थापनांकडून विविध 'वेब सिरीज' भारतात दाखवल्या जात आहेत. या मालिकांमध्ये मुख्यत्वेकरून अश्लीलता आणि हिंसक दृश्ये यांचा भडिमार असतो. दुर्दैवाने सध्यातरी यांवर अंकुश ठेवता येईल, असा कोणताही कायदा अस्तित्वात नाही; मात्र कायदा नाही म्हणून अशा प्रकारच्या 'वेब सिरीज' चालू ठेवण्यास अनुमती देणे म्हणजे स्वैराचारी आणि आंबटशौकीन यांना गुन्हे करण्यास प्रोत्साहन दिल्यासारखे आहे.

इ २. एकत्र कुटुंबपद्धती; संयत काम जीवन; कुटुंब, समाज आणि राष्ट्र या स्तरावर व्यापक विचार करणे, यांसारख्या भारतीय संस्कृतीच्या मूल्यांवर भोगवाद, चंगळवाद, स्वैराचार, हिंसक वृत्ती आदींद्वारे थेट घाला घातला जात आहे.

इ ३. 'नेटफ्लिक्स'वर सध्या 'सेक्स एज्युकेशन'सारख्या मालिका दाखवल्या जात असून या मालिकेत सर्व मर्यादा पार करण्यात आल्या आहेत. मनोरंजनाच्या नावाखाली 'नेटफ्लिक्स'वर 'पॉर्न' दाखवण्यात येत आहे. 'गंदी बात' नावाची समलैंगिक संबंधांवर आधारीत 'बेव सिरीज' दाखवण्यात येत असून यात वहिनी-पतीचा भाऊ, महिला, नोकर आणि पती यांच्यातील अनैतिक संबंध दाखवण्यात येत आहेत. 'वेब सिरीज'चा परिणाम आता थेट जनमानसावर दिसत असून याद्वारे लैंगिक भावना उद्दिपत होऊन बलात्काराच्या घटना घडल्याची अनेक उदाहरणे आहेत, तसेच यातील हिंसक दृश्ये पाहून

कोवळ्या वयातील लहान मुलेही खून करण्यास मागे-पुढे पहात नसल्याचे समोर येत आहे. या ‘वेब सीरीज’ सहजतेने संकेतस्थळांवर पहाण्यासाठी उपलब्ध होत असून किशोरवयीन तरुणांमध्ये याचे आकर्षण वाढत आहे.

इ ४. मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली असून त्यावर सध्या सुनावणी चालू आहे. न्यायालयाने नोटीस पाठवल्यावर ‘वेब सिरीज’ चालवणाऱ्या काही आस्थापनांनी सुनावणीसाठी उपस्थित रहाण्यास नकार देत ‘आम्हाला माध्यम स्वातंत्र्य असून संकेतस्थळाद्वारे आम्ही काय दाखवावे, याचे बंधन सरकार आम्हाला घालू शकत नाही’, असे उद्दाम उत्तर दिले. यातूनच या ‘वेब सीरीज’वर कायद्याचा कोणताही अंकुश नाही.

**ई. सार्वजनिक ठिकाणी विनामूल्य इंटरनेटची उपलब्धता :** सध्या अनेक ठिकाणी इंटरनेट विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येते. विशेष करून अनेक महाविद्यालये, रेल्वे आणि बस स्थानके यांच्या कार्यक्षेत्रात हे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येते. अनेक विद्यार्थी याचा शैक्षणिक उपयोग करण्याऐवजी त्याचा वापर अश्लील संकेतस्थळ बघण्यासाठीच करतात, असे निदर्शनास आले आहे. देशभरात ‘विनामूल्य वायफाय सेवे’चा सर्वाधिक लाभ बिहार येथील पाटणा रेल्वे स्थानकातील प्रवासी घेत असून यात पॉर्न साइट सर्च करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे, असे ‘रेलटेल’च्या एका अधिकाऱ्यांनी सांगितले, असे वृत्त प्रकाशित झाले होते.

**उ. परिणाम :** या सर्वांचा परिणाम पहाता भारत सरकारच्या ‘नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस’च्या वतीने केलेल्या एका सर्वेक्षणाचा निष्कर्ष आपल्यासमोर मांडत आहोत.

उ १. शहरी भागात तरुणाईचा ‘सेक्स’बद्दलचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. इथे सेक्स, शरीरसंबंध सामान्य बाब बनले आहेत. शहरी भागातील गर्भपाताच्या आकडेवारीवर नजर टाकली, तर २० वर्षांखालील तरुणींची संख्या सर्वाधिक आहे. कमी वयातच तरुण-तरुणी शारीरीक सुखाच्या ओढीने जवळ येत आहेत.

उ २. आकडेवारीनुसार ग्रामीण भागात गर्भवती रहाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ७७ टक्के तर, शहरी भागात ७४ टक्के आहे. ग्रामीण भागात गर्भपाताचे प्रमाण दोन टक्के, शहरात तीन टक्के आहे. पण शहरी भागात वीसवर्षाखालील वयोगटातील गर्भपात करण्याचे प्रमाण सर्वाधिक १४ टक्के आहे.

**इतकी भयावह परिस्थिती पहाता आम्ही मागणी करत आहोत की....**

१. देशातील महिला आणि अल्पवयीन मुले यांवरील वाढते लैगिंक अत्याचार अन् बलात्कार रोखण्यासाठी त्वरीत ‘पॉर्न साइट’वर बंदी घालावी

२. अनैतिक आणि अवैध धंदे, जुगार, अंमली पदार्थ, मानवी तस्करी आदी अनेक गोष्टींवर प्रतिबंध आणण्यासाठी ‘ऑनलाइन’ वेश्याव्यवसाय चालवणारी आणि अन्य अश्लील संकेतस्थळे यांवर बंदी घालावी

३. अश्लीलता, अनैतिकता आणि गुन्हेगारी वृत्तीकडे वळण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या ‘वेब सिरीज’ बंद कराव्यात

४. सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या विनामूल्य इंटरनेटच्या सुविधा पुरवतांना त्यात ‘पॉर्न साइट’, अश्लील संकेतस्थळे, ऑनलाइन वेश्याव्यवसाय करणारी संकेतस्थळे, अश्लील वेब सीरीज या उपलब्ध होणार नाहीत, अशी व्यवस्था निर्माण करावी.

आपला विश्वासू,

हिंदु जनजागृती समितीकरिता
(संपर्क : )